आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२१ मे २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- २१ व्या शतकाच्या आकांक्षांशी इंडिया आघाडी समरस होऊ शकत नसल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची टीका
- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या, इयत्ता बारावीच्या परीक्षेत ९३ पूर्णांक ३७ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण
- माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांना देशाची आदरांजली
- जागतिक बॅडमिंटन क्रमवारीत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही भारतीय जोडी पुन्हा अव्वलस्थानी

  **आणि**
- मध्य प्रदेश, विदर्भ आणि गुजरातमधे पुढचे चार दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता / नैऋत्य मोसमी पावसाच्या पुढच्या वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल

**<><><><><>**

२१ व्या शतकाच्या आकांक्षांशी इंडिया आघाडी समरस होऊ शकत नाही, अशी टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे ते आज. बिहारमधे मोतीहारी इथं भाजपा उमेदवाराच्या प्रचारसभेत बोलत होते. या शतकातली स्वप्नं राष्ट्रीय लोकशाही आघाडीच पूर्ण करेल. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडी पराभूत होणार असल्याचा दावाही मोदी यांनी यावेळी केला.

काँग्रेस पक्ष फक्त एका कुटुंबासाठीच काम करतो, आपण महात्मा गांधी यांच्या सत्याग्रह आणि स्वच्छाग्रहाच्या विचारांपासून प्रेरणा घेतली आहे. काँग्रेस महात्मा

गांधींची स्वप्नं पूर्ण करू शकली नाही, असं ते म्हणाले. महाराजगंज लोकसभा मतदारसंघातही मोदी यांनी सभा घेतली.

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथंही भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी त्यांनी सभा घेतली. समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षाने गुन्हेगारांना आश्रय दिला होता. त्यांच्या सरकारनं माफियांना मोकळं रान सोडलं होतं, अशी टीका मोदी यांनी या सभेत केली. भाजपा सरकारनं अशा गुन्हेगारांना गजाआड केलं असंही मोदी यावेळी म्हणाले.

उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही बलरामपूर आणि आझमगड इथं प्रचारसभा घेतल्या. तर समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी तृणमूल काँग्रेसचे भदोहीचे उमेदवार ललितेशपती त्रिपाठी यांच्यासाठी आयोजित सभेला संबोधित केलं.

<><><><><>

बिहारमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महायुतीच्या अनेक नेत्यांनी आज लोकसभा निवडणुकीच्या उर्वरित टप्प्यांच्या प्रचारात भाग घेतला. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी उद्योग व्यवसायातल्या प्रतिनिधींशी पाटणा इथं संवाद साधला. राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसमुळेच बिहार मागे राहिल्याचा आरोप त्यांनी वार्ताहर परिषदेत केला. भाजपाचे बिहार प्रदेशाअध्यक्ष सम्राट चौधरी यांनीही तीन ठिकाणी प्रचारसभा घेतल्या.

राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी सिवान मतदारसंघात झिरादेई इथं प्रचारसभेला संबोधित केलं. भारताची घटना आणि आरक्षण वाचवण्याची ही लढाई आहे, असं ते म्हणाले. त्यांनी पूर्व चंपारण, पश्चिम चंपारण आणि वैशाली इथंही प्रचार केला.

<><><><><>

झारखंडमध्ये झामुमोचं सरकार आल्यापासून भ्रष्टाचारात वाढ झाली असून त्यामुळे राज्याचा विकास खुंटला आहे, अशी टीका संरक्षण मंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते राजनाथ सिंह यांनी केली. पक्षाचे उमेदवार धुल्लू महातो यांच्या प्रचारसभेत ते आज बोकारो इथं बोलत होते.

भाजपा सरकारमधल्या एखाद्या मंत्र्यांचं नाव भ्रष्टाचार प्रकरणात उघड झालं तर त्याला पक्षातून बाहेर काढलं जाईल, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचा कारावास हा राजकीय कटाचा भाग असल्याचा आरोप आम आदमी पार्टीचे नेते आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केला. ते आज जमशेदपूरमध्ये प्रचार करताना बोलत होते. आता हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना या किल्ला लढवत असून त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासमोर आव्हान निर्माण केलं आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. त्यात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचं प्रमाण ९३ पूर्णांक ३७ शतांश टक्के आहे.

यंदा या परीक्षेसाठी राज्यातल्या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १४ लाख २३ हजार ९७० नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १३ लाख २९ हजार ६८४ जण उत्तीर्ण झाले आहेत.

यंदा कोकण विभागात सर्वाधिक ९७ पूर्णांक ५१ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुंबई विभागाचा निकाल सर्वात कमी असून त्याची टक्केवारी ९१ पूर्णांक १५ शतांश इतकी आहे.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त देश त्यांना आदरांजली वाहत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राजीव गांधी यांना समाजमाध्यमावरून आदरांजली वाहिली. तसंच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत वीर भूमी इथं राजीव गांधी यांच्या स्मृतीस्थळावर जाऊन अभिवादन केलं. दरम्यान, मुंबईत मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव रोशनी कदम पाटील यांनी राजीव गांधी यांना अभिवादन केलं. तसंच त्यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना दहशतवादविरोधी दिनानिमित्त शपथ दिली. राजीव गांधी यांचा स्मृतीदिन देशात दहशतवाद विरोधी दिन म्हणून पाळला जातो.

<><><><><>

भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं नुकत्याच पार पडलेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत अजिंक्यपद पटकावल्यानंतर जागतिक बॅडमिंटन संघटनेच्या क्रमवारीत पुन्हा अव्वलस्थानी झेप घेतली. या स्पर्धेच्या आधी ही जोडी तिसऱ्या क्रमांकावर होती. मात्र, उत्तम कामगिरीच्या जोरावर त्यांनी या स्पर्धेतले सर्व सामने थेट गेम्समध्ये जिंकले आणि जागतिक क्रमवारीत पहिलं स्थान पुन्हा मिळवलं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायजर्स हैदराबाद आणि कोलकता नाईट राईडर्स यांच्यात पात्रता फेरीतला पहिला सामना अहमदाबादमधल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरु आहे.

सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनरायझर्स हैदराबादच्या ६ षटकात ४ बाद ४५ धावा झाल्या होत्या.

पात्रता फेरीतला दुसरा सामना उद्या राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात होईल. स्पर्धेतला अंतिम सामना रविवारी होणार आहे.

<><><><><>

उत्तर भारतात आज बहुतांश ठिकाणी आज उष्णतेच्या लाटेचा प्रभाव दिसून आला. मध्य प्रदेश, विदर्भ आणि गुजरात इथंही तत्सम परिस्थिती होती. या भागात पुढचे चार दिवस उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट हवामान विभागानं दिला आहे.

दिल्लीतही पुढचे दोन ते तीन दिवस उष्णतेच्या लाटेचा प्रभाव राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

दरम्यान, नैऋत्य मान्सूनच्या पुढच्या वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं हवामान विभागानं सांगितलं. आग्नेय अरबी समुद्राचा काही भाग, मालदीवचा आणखी काही भाग, कोमोरीन परिसर, दक्षिण बंगालचा उपसागर आणि अंदमान-निकोबार बेटांच्या बऱ्याच भागात तसंच अंदमान समुद्राच्या आणखी काही भागात नैऋत्य मान्सून येत्या दोन दिवसांमध्ये पुढे सरकेल अंदाज आहे.

तमिळनाडू, पुदुचेरी, करईकळ, केरळ, माहे आणि कर्नाटकात पुढच्या दोन ते तीन दिवसांत जोरदार पावसाची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

<><><><><>

पुण्यातल्या कल्याणीनगर भागात झालेल्या अपघातप्रकरणी कुणालाही पाठीशी न घालता कठोर कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्याच्या पोलीस आयुक्तांना दिले आहेत. वाहन चालवण्याचं रीतसर प्रशिक्षण आणि परवाना नसूनही अल्पवयीन आरोपीच्या वडलांनी त्यांची कार त्याला दिल्याची माहिती अल्पवयीन आरोपीनं पोलिसांना दिली होती. उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज या प्रकरणाच्या तपासाची माहिती घेतली.

सुधारित बालगुन्हेगारी कायद्यातल्या तरतुदींनुसार पोलिसांनी या प्रकरणी अल्पवयीन आरोपीवर कलम ३०४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तसंच आरोपीच्या वडलांवरही गुन्हा दाखल झाला आहे. दोषींवर कारवाई केली जाईल, असं आश्वासनही फडनवीसांनी दिलं.

<><><><><>

यंदाच्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी मतदान न केल्याबद्दल भाजपानं झारखंडमधल्या हजारीबाग मतदारसंघाचे विद्यमान खासदार जयंत सिन्हा यांच्यावर कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. सिन्हा यांनी मतदान न केल्यामुळं भाजपाची प्रतिमा मलीन झाली असल्याचं या नोटिशीत नमूद केलं आहे.

<><><><><>

पंजाबमधले आम आदमी पक्षाचे माजी आमदार जगबीर सिंह ब्रार यांनी आज भाजपामध्ये प्रवेश केला. नवी दिल्ली इथल्या भाजपा मुख्यालयात पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुग यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षात समावेश करण्यात आला.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज नवी दिल्लीतल्या इराणच्या दूतावासाला भेट देऊन इराणचे अध्यक्ष एब्राहिम रईसी आणि परराष्ट्र मंत्री होसैन अमीर अब्दोल्लाहियान यांच्या अपघाती निधनाबद्दल भारताकडून तीव्र शोक व्यक्त केला.

//<><><><><>//